PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Hello Jai Hind
Year: 2011

Song: Angnaat Umalali Kali
Lyricist:

अंगणात उमलली कळी चाफयाची
जडली नजर तेथे कोण्या राजयाची
अंगणात उमलली कळी चाफयाची
तिकताना तिकताना ता ति
तिकताना तिकताना
जडली नजर तेथे कोण्या राजयाची
तिकताना तिकताना ता ति
तिकताना तिकताना
राजयाच्या महालाला जाशील गं राणी
मनामधे चांदवा नि डोळा का गं पाणी
उचला सयांनो पाय उचला
नाचला गं मोर बाई नाचला
उचला सयांनो पाय उचला
नाचला गं मोर बाई नाचला हां...

आंबयाच्या डहाळ्या गं मांडव बांधिल्या
सुखाच्या चांदण्या तुझ्या कपाळी गोंधिल्या
हां आंबयाच्या डहाळ्या गं मांडव बांधिल्या
तिकताना तिकताना ता ति
तिकताना तिकताना
सुखाच्या चांदण्या तुझ्या कपाळी गोंधिल्या
तिकताना तिकताना ता ति
तिकताना तिकताना
मायबाप आजवरी सावली झाले गं
जाशी सासराला त्यांचे काळीज हले गं
उचला सयांनो पाय उचला
नाचला गं मोर बाई नाचला

उचला सयांनो पाय उचला
नाचला गं मोर बाई नाचला हां...
नको रे घालवू बाबा
इतकी का जड झाले
कसे सावरू डोळे
आसवांचे कड आले
धाडले असे दूर
तुझी मी नव्हते कोणी
ओलांडते मी वेस
आता तुझी पाहूणी
आई तू जपली तळहातावर सदाफुली
तुझ्या अंगणी फुलली माझी जाई जुई
असू दे आई आधाराला तुझा उंबरा
अंगणात उमलली कळी चाफयाची
जडली नजर तेथे कोणा राजयाची
उचला सयांनो पाय उचला
नाचला गं मोर बाई नाचला हां...

चाफयाची कळी बाई राजयाने नेली
ऐरावत इंद्राचा अंबारीनं गेली
हां... चाफयाची कळी बाई राजयाने नेली
तिकताना तिकताना ता ति
तिकताना तिकताना
हां... ऐरावत इंद्राचा अंबारीनं गेली
तिकताना तिकताना ता ति
तिकताना तिकताना
रूप्याच्या महालाला कोयंडा सोन्याचा

Literacy for a Billion

वाट नखरेला बाई परतविण्याचा
उचला सयांनो पाय उचला
उचला सयांनो पाय उचला
उचला सयांनो पाय उचला
टिचला गं चूडा बाई टिचला हां...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*